# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया

क्र. शावैमगों/ ख.वि./ २४६५ /१८, दिनांक २५ /१०/२०१८.

***निविदा सुचना.***

सुचित करण्यात येते की, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया येथे विद्यार्थ्यांकरिता दोन ३५ सिटर वाहन खालील वर्णनाचे प्रतीमहा भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. इच्छुक असणा-यांनी मोहरबंद लिफाफामध्ये दर नमुद करुन दि. ३१/१०/२०१८ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत हया कार्यालयाच्या जावक विभागामध्ये प्रत्यक्ष देण्यात यावे. उपरोक्त दिनांकानंतर आलेल्या दरपत्रकांबाबत विचार करण्यात येणार नाही.

तसेच दिनांक ३१/१०/२०१८ रोजी ही दरपत्रके दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील. याबाबत माहिती शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया या संस्थेच्या www.gmcgondia.in वेबसाईटवर प्रसारीत करण्यात येत आहे.

| अनु. क्र | वाहनाचा तपशिल |
|---|---|
| १ | ३५ सिटर वाहन (विद्यार्थी बस) डिझेल नॉन एसी |

टिप : -

१) वाहन प्रतिमाह भाडे तत्वावर राहील.
२) वाहनामध्ये इंधन स्वतःच्या पैसाने भरावे लागेल.
३) अनुदान उपलब्ध असल्यास भाडे अदा करण्यात येईल.
४) अनुभवी परवानाधारक वाहन चालक असणे गरजेचे राहील.
५) एकंदरीत इंधन/ मेन्टेनंस हा सर्व खर्च त्यात समाविष्ट राहील.
६) एक हजार किलो मीटर पर्यंत वाहन चालल्यास वैद्य राहील.

अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
गोंदिया.

# शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया

<u>*अटी व शर्ती*</u> : -

१) वाहनाचे दर व वाहनाचे इंधन, वंगण, किरकोळ व मोठी सर्व दुरुस्ती, वाहन चालकाचे वेतन व भत्त्यावरील खर्च वाहन परमीट इ. सर्व खर्चासमवेत राहील.

२) पिरीऑडीकल, मेंटनेस, सर्व्हीसिंग इ. करिता आठवडयातुन एकदा बहुतेक सुट्टीचे दिवस आवश्यकतेनुसार वाहन तात्पुरते मुक्त करण्यात येईल. व त्याकरिता होणारी वाहन धाव भाडे मागणीसाठी हिशोबी घेतला जाणार नाही.

३) दौऱ्याचे वेळी ठिकठिकाणांचा द्यावयाचा टोल टॅक्स इ. अधिभार वाहन मालकाकडे राहील व त्या देयकाची प्रतीपुर्ती कार्यालयामार्फत देय राहणार नाही.

४) वाहन नेहमी सुस्थितीत असावे व कि.मी. चेन बंद नसावी. किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन मालकाची जबाबदारी राहील. किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एक दिवसात तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती तीन दिवसात करुन देण्याची जबाबदारी वाहनधारकाची राहील.

५) वाहनाचे दुरुस्तीचे कालावधीत दुसऱ्या वाहनाची पर्यायी व्यवस्था करुन देण्याची जबाबदारी आपली राहील.

६) वाहन चालकाच्या / मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे वाहन बंद स्थितीत राहील्यास शासकिय कामावर अनिष्ट परिणाम झाल्यास एका महिन्याला वाहनाच्या वापराची जी रक्कम येईल त्याची प्रति दिवस सरासरी लक्षात घेऊन तेवढी रक्कम त्या कालावधीकरिता मासिक भाडयाचे रक्कमेतून कपात करण्यात येईल अथवा दरपत्रके रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सबंधित पुरवठा धारकाचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

७) वाहनाचे सर्व दस्ताऐवज आर.टी.ओ. नियमाप्रमाणे ठेवावे लागेल. सर्व दस्ताऐवजाची दुय्यम प्रत अधिष्ठाता कार्यालय शासकिय वैद्यकिय महाविद्यालय , गोंदिया येथे जमा करावी.

८) वाहन मालकाने जे वाहन क्रमांक दर्शवण्यात आलेले आहे तेच वाहन आदेश मिळाल्यानंतर कार्यालयात कार्यरत राहील. काही कारणास्तव वाहन बदली करावयाचे असल्यास अधिष्ठाता, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया यांच्याकडुन पुर्व परवानगी घ्यावी लागेल.

९) वाहनाची मासिक कि.मी. मर्यादा ही विहित मर्यादेपेक्षा अधिकची झाल्यास अधिकचे कि.मी. करीता विहित शासन निर्णय/परिपत्रकानुसार प्रति कि.मी. चे दर अथवा सक्षम अधिकारी वाटाघाटी करुन ठरवतील. ते दर लागु राहील तसेच विहित शासन निर्णय / परिपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करुन अधिकची धावसंख्येची रक्कम अदा करण्यात येईल . वाहन दुरुस्ती करिता अथवा इंधनाकरिता गोंदिया मुख्यालयाबाहेर किंवा इतरत्र नेणे आवश्यक असल्यास त्यासाठी होणारी धाव ग्राहय धरली जाणार नाही.

१०) सदरहु व्यवहारसंबधी काही कारणास्तव अथवा वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास विधीवत कार्यवाही करण्याची वेळ आल्यास अथवा सदरहु प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास त्याची मर्यादा व गोंदिया न्यायालयापर्यंत मर्यादित राहील.

११) कंत्राटाचा कालावधी कमी करणे अथवा वाढविणे अथवा कोणतेहही कारण न दर्शविता वाहन बंद करणे याविषयीचे अधिकार अधिष्ठाता ,शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया यांना राहील.

१२) पुरवठा आदेश मिळाल्यापासून आदेशित वाहनाचे पुरवठा ०७ दिवसाच्या कालावधीत होणे आवश्यक आहे

अधिष्ठाता,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया